**26 फेब्रुवारी 2009**

# कै.प.बा.सामंत यांना श्रद्धांजली

**मुंबई, गुरुवार :** "स्वतः जमीनदार असूनही सामान्यांना हक्काचे घर मिळवून देण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी अविरत झटलेला हाडाचा समाजवादी म्हणजे स्व.प.बा.सामंत. पश्चिम उपनगरांतील समाजवादी चळवळीचे अध्वर्यू असलेल्या कै.प.बा.उर्फ बाबुरावांनी आपल्या तत्वांशी जराही तडजोड न करता अन्य विचारसरणीच्या माझ्यासारख्या अनेकांना स्नेह दिला. आम्ही दोघेही राहात असलेल्या गोरेगावच्या सामाजिक जीवनात तर त्यांना भीष्माचार्यांचे स्थान होते. अंतुलेंच्या सिमेंटच्या भ्रष्टाचाराविरुध्द आम्ही विरोधकांनी दिलेल्या लढ्यात न्यायालयीन लढाईत ते अग्रणी होते. निम्न मध्यमवर्गीयांचे हक्काच्या घराचे स्वप्न साकारण्यासाठी त्यांनी उभारलेल्या नागरी निवारा प्रकल्पाच्या रुपाने मुंबईकरांना त्यांचे चिरस्मरण राहील" अशा शब्दात माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांनी कै.प.बा.सामंत यांना श्रद्धांजली वाहिली.

**(कार्यालय सचिव)**